**रे.क्रि.केस नं. ४५/ २०१९**

महाराष्ट्र शासन वि. धनाजी उर्फ दादासो तानाजी मगदुम वगैरे ३

**ॆनिशाण नं. ३४/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – संपत नामदेव शिंदे

वय – ५२ वर्षे

धंदा – शेती

राहणार – केखले ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

सध्या रा. जालिंदर, आर्मी हेड कॉटर्स, पंजाब

मोबाईल क्र. ७८७५७५९५००

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

१.घटना दि. ०३.०२.२०१९ रोजी माझ्या घरी सकाळी साडे आठ ते नउ वाजण्याच्या सुमारास घडली होती. माझ्या घरी मी माझी पत्नी व आई असे राहण्यास होतो. त्यावेळी आरोपी तेथे आमच्या घरी आले. तीन आरोपींनी मला व माझ्या पत्नीला"तु व्हॉइस चेअरमन यांना फोन का केलास" असे म्हणून शिवीगाळ केली. आरोपी दादासो याने माझी गळपटटी धरली व मला घरातून बाहेर घेतले. तसेच उर्वरित आरोपी शहाजी व जयवंत यांनी मला काठीने मारहाण केली. त्यांनी मला पाठीवर व पोटावर व पायावर मारहाण केली. तसेच सदर आरोपी यांनी माझ्या पत्नीला मला सोडवायला आली असता काठीने मारहाण केली. माझ्या पत्नीला पाठीवर तसेच डाव्या हातावर मारहाण केली. पत्नीच्या हातावर मारहाण केल्यामुळे तिच्या हातातील बांगडया फुटल्या व तिच्या हाताला जखम झाली. त्यानंतर आमचे चुलत भाऊ सर्जेराव अर्जुन हे तेथे आले व त्यांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर आरोपी यांनी "तुला सोडत नाही" अशी धमकी दिली व ते तेथून निघून गेले. त्यानंतर सदर आरोपींबाबत तक्रार देण्याकरिता मी व माझी पत्नी कोडोली पोलीस स्टेशन येथे

गेलो. पोलिसांनी आम्हाला तेथून प्रथम उप जिल्हा रुग्णालय येथे उपचाराकरिता पाठविले. पोलिसांनी आमचेकडे यादी दिली नव्हती मात्र आमचे सोबत पोलीस आले होते. मी व माझी पत्नी उप जिल्हा रुग्णालयात गेलो होतो. तेथे आमच्यावर उपचार करण्यात आला, आम्हाला मलम पटटी करण्यात आली. त्यानंतर परत उपचार घेवून आम्ही कोडोली पोलीस स्टेशन येथे पुन्हा आलो. आमचेकडून पोलिसांनी आमची फिर्यादी नोंदवून घेतली. आता मला दाखविण्यात आलेली प्रथमवर्दी व फिर्याद तीच आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सहया आहेत. त्यास नि. ३५ व नि. ३६ देण्यात येत आहे. त्यानंतर पोलीस आमचेकडे पंचनामा करण्याकरिता आले होते. मी पोलिसांना त्यावेळी घटनास्थळ दाखविले होते. घटनास्थळ आमच्या घरात व दारातच होते. पोलिसांना तेथे काठया आढळून आल्या. पोलिसांनी सदरच्या काठया त्यांच्याकडे जमा करून घेतल्या. तसेच पोलिसांनी सदर पंचनामा करतेवेळी घटनास्थळाचे फोटो काढले होते. आता मला दाखविण्यात आलेल्या आर्टिकल अ व ब या दोन फोटोंमध्ये मी, पंच , पोलीस असे दिसून येत आहोत. त्यातील आर्टिकल ब या फोटोमध्ये मी, पंच , पोलीस व काठया दिसून येत आहेत. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या आर्टिकल क व ड या दोन काठया त्याच आहेत.

२.पोलिसांनी माझी फिर्याद घेतल्यानंतर पुढे काही दिवसांनी माझे पुन्हा पुरवणी जबाब नोंदविला होता. सदर जबाब देतेवेळी मी तानाजी पांडुरंग मगदूम यांनी काही केले नाही, तसेच त्यांचा या प्रकरणाशी संबंध नाही त्यामुळे त्यांचे नाव वगळण्यात यावे असे कथन केले होते. सदरबाबत आता मला कोणतेही कथन करावयाचे नाही. आता मला दाखविण्यात आलेला पुरवणी जबाब तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास नि .३७ देण्यात येत आहे. माझ्या माहितीनुसार सदर तानाजी मगदुम हे हयात आहेत. माझी पत्नी संगिता संपत शिंदे या दि. २९.०९.२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासाकरिता आरोपी यांना पुकारले असता आरोपी गैरहजर, सदरबाबत वकील यांना विचारणा केली असता त्यांनी आरोपी हे त्यांचया संपर्कात नसल्याचे त्यांनी कथन केले.**

**सबब उलटतपास नाही असा आदेश पारीत करणेत येत आहे.**

**आरोपी यांचेविरुद्ध जामीनपात्र वॉरंट काढण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा

दिनांक. ०९.०१.२०२६